## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
## दिनांक : २५.०३.२०१५ रोजी दुपारी ३.३० वाजता
## आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : १**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे**
**सन २०१४-२०१५ चे सुधारित अंदाजपत्रक व**
**सन २०१५-२०१६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

---------------------------------------------

**ठराव क्रमांक : ६६९४** **दिनांक : २५/०३/२०१५**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०१४-२०१५ च्या सुधारित अंदाजपत्रक रु. १७४.०९ कोटी रक्कमेच्या तूटीच्या अंदाजपत्रकास व सन २०१५-२०१६ च्या रु. ७५५.७३ कोटी रक्कमेच्या तुटीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच बांधकाम कार्यक्रमास मान्यता देण्यात येत आहे.

**सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.**

**बाब क्रमांक : ३**

**विषय :- महाराष्ट्र निवारा निधीचे सन २०१४-२०१५ सुधारित अंदाज व सन २०१५-१६ वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

------------------------

**ठराव क्रमांक : ६६९५** **दिनांक : २५/०३/२०१५**

एकमताने निर्णय घेतला की, शासन निर्णय क्र.नानिफं २००८/प्र.क्र.२१३/गृनिधो-२, दिनांक ३१/०५/२०१० नुसार महाराष्ट्र निवारा निधीचे लेखे स्वतंत्र प्रत्येक वर्षी विधान मंडळास सादर करावयाचे असल्याने महाराष्ट्र निवारा निधीचा अर्थसंकल्प म्हाडा अर्थसंकल्पात अंतर्भूत न करता, महाराष्ट्र निवारा निधीचा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. महाराष्ट्र निवारा निधीचे सन २०१४-२०१५ सुधारित व सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे.

JNNURM कार्यक्रमाअंतर्गत अभिकरण शुल्क म्हणून एकूण प्रकल्प खर्चाच्या ५% रक्कम म्हाडास देण्याची तरतूद आहे, त्यानुसार सदर अभिकरण शुल्क म्हाडास प्राप्त होणेकरिता मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांचे स्तरावर कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.**